# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग

मुख्य प्रशासकीय इमारत, पहिला मजला, सिंधुदुर्गनगरी, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग-४१६८१२

(सामान्य शाखा)

सत्यमेव जयते

दूरध्वनी क्रमांक ०२३६२-२२८६०८, २२८८४७ ईमेल-collroffice@gmail.com


**अति तात्काळ**

क्र.साशा/सेतू/करोना/२०२०
जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग
दिनांक ०८/०४/२०२०

प्रति,

सर्व सी.एस.सी.
केंद्रचालक, जिल्हा सिंधुदुर्ग

विषय - सी.एस.सी. केंद्रातून डीजीपे सर्व्हीस नागरिकांना उपलब्ध करुन देणेबाबत...

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सिंधुदुर्ग जिल्हयातील सर्व सी.एस.सी. केंद्रचालकांना सुचित करण्यात येते की, सद्यस्थितीमध्ये राज्यामध्ये कोव्हीड-१९ या आजाराने थैमान घातलेले आहे. तरी नागरिकांना बँकीग सुविधा नियमित स्वरुपात उपलबध होण्यास ब-यास अडचणी निर्माण होत आहे.

तरी त्याबाबत सिंधुदुर्ग जिल्हयामधील सर्व सी.एस.सी. केंद्रचालकांना याद्वारे आदेशित करण्यात येते की, प्रत्येक केंद्रामधून DIGIPAY द्वारे (पैसे काढणे, टाकणे, पैसे पाठविणे करणे तसेच स्वतःच्या खात्यामधील किमान रक्कम तपासणे) ह्या सुविधा प्रत्येक ग्राहकांना पुरविण्यात याव्यात. याव्यतिरिक्त सी.एस.सी.केंद्रामधून मिळणा-या इतर कोणत्याही सुविधा उपलब्ध करुन देवू नये.

सदर सुविधा उपलब्ध करुन देताना शासनाने दिलेल्या निर्देशाचे काटेकोरपणे तंतोतंत पालन करावे. उदा. सोशल डिस्टन्स, केंद्राबाहेर हात स्वच्छ धुण्याकरीता पाणी, हॅन्डवॉश व सॅनिटायझर ठेवावे. तसेच गर्दी होणार नाही, याबाबतची दक्षता पाळावी.

(के. मंजूलक्ष्मी)
अध्यक्ष, जिल्हा सेतू समिती
सिंधुदुर्ग

**प्रत माहिती तथा उचित कार्यवाहीसाठी**

१) श्री. वैभव देशपांडे, राज्य व्यवस्थापक , सी.एस.सी. कार्यालय, बेलापुर, नवी मुंबई.
२) श्री. परेश परब, जिल्हा व्यवस्थापक, आपले सरकार सेवा केंद्र जिल्हा परिषद सिंधुदुर्ग
3) श्री. प्रसाद मारुती जाधव, जिल्हा व्यवस्थापक, सी.एस.सी. केंद्र सिंधुदुर्ग.
४) श्री. तोरणकुमार इनामदार, जिल्हा व्यवस्थापक, सी.एस.सी. केंद्र सिंधुदुर्ग.
५) श्री. सिध्देश गावडे, जिल्हा समन्वयक, सी. एस. सी. केंद्र सिंधुदुर्ग.